ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55027

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३६ पुणे, बुधवार, १८ मार्च, १९७० अंक ६





### बँकच्या प्यूनचा गणवेश घालून चोरी करणारा विद्यार्थी

महाराष्ट्र स्टेट को. बँकेच्या नागपूर येथील शाखेतून १ लक्ष रु. लांबविण्याचा एक प्रयत्न अयशस्वी ठरला. पोलिसांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, २१ वर्षांचा एक विद्यार्थी, मुरगन राजू ह्याने बँकेच्या प्यूनचा गणवेश घातला होता. तो रोख रक्कम असलेली थैली नेण्याच्या बेतात असतानाच भाऊराव मोहोड ह्या व्यापाऱ्याने त्याला पकडले. नागपूर डि. को. बँकेचा कॅशिअर १ लक्ष रु. ची रक्कम स्टेट को. बँकेच्या कचेरीत भरण्यासाठी गेला होता. कॅशिअरच्या कौंटरच्या आत तो उभा होता. त्याने कॅशची थैली पायापाशी ठेवली होती. स्टेट को. बँकेच्या सिताबर्डी शाखेचे एक सेवक, देशपांडे, हेही तेथे काही कामासाठी गेले होते व तेहि कॅशिअरजवळ उभे होते. मुरगन राजूही कौंटरच्या आत गेला, परंतु त्याच्या अंगावर प्यूनचा गणवेश असल्यामुळे त्याच्याकडे कुणी लक्ष दिले नाही. त्याने थैली उचलली व तो दरवाज्याकडे निघाला, इतक्यात देशपांडे ह्यांनी चोरी पाहिली व त्यांनी आरडाओरडा केला. मोहोडनी मुरगनवर झडप घालून त्याला पकडले. मोहड आणि देशपांडे ह्यांना अनुक्रमे १०० रु. व ५० रु. तात्काळ बक्षीस देण्यात आले.

---

### १४ बँकांच्या भरपाई रकमेचा प्रश्न

"राष्ट्रीयीकरण केलेल्या बँकांना ८७·४० कोटी रुपयांची भरपाई केली जाणार आहे. ही मुख्यतः छोट्या भागधारकांनाच मिळणार आहे. १४ बँकांच्या एकूण भागांपैकी ३०% भाग लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन आणि युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया हे धारण करीत आहेत. १४ बँकांपैकी सर्वात मोठ्या म्हणजे सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या २७,३७९ भागधारकांपैकी २४,८४२ (म्हणजे ८०%) भागधारक १०० पेक्षा कमी भाग धारण करणारे आहेत. हीच परिस्थिती इतर बँकांत असणार. बँकांच्या मुख्य कचेऱ्यांच्या व शेकडो शाखांच्या जमिनी व इमारती ताळेबंदात भरपूर घसारा काढून दाखविलेल्या आहेत. वास्तविक त्यांची बाजारभावाने किंमत खूपच मोठी आहे. त्याचप्रमाणे त्यांची गुप्त गंगाजळीही विचारात घेतली गेली पाहिजे. जुलै, १९६९ ते १० फेब्रुवारी, १९७० ह्या काळात (म्हणजे बँकांचे राष्ट्रीयीकरण जेव्हा बेकायदा होते— पुढे नव्या ऑर्डिनन्सने त्याला कायदेशीरपणा दिला.) बँकांना जो नफा झाला, तो भागधारकांना मिळाला पाहिजे. भरपाईच्या रकमेवर जुलै, १९६९ नंतर ४% व्याजाची ऑर्डिनन्समध्ये तरतूद आहे ती ९½% ते १०% तरी हवी; तारणावरील कर्जांना हाच दर लागू असतो. भरपाईची रक्कम ठरविताना बँकांच्या छापील ताळेबंदातील आकड्यांचाच फक्त विचार करणे अन्यायाचे होईल."

(डॉ.) आर. सी. कूपर

---


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :- ३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार - सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

THE BELGAUM BANK LIMITED

Estd. 1930

SCHEDULED BANK

*Regd. Office* : 659–60, Raviwar Peth, Belgaum

Share Capital : Rs. Over 8 Lakhs
Reserves : Rs. Over 8½ Lakhs
Deposits : Rs. 5 Crores & 75 Lakhs

39 Branches in the States of Mysore & Maharashtra & Goa Territory – Major number of Branches in Rural Areas – Facility of Safe Deposit Lokers at Belgaum, Gokak and Nipani Branches in Mysore State.

S. Y. KAMAT — *General Manager.*
G. V. SARAF — *Chairman.*

☆ अर्थ ☆

बुधवार, १८ मार्च, १९७०



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## १९६३ च्या अमेरिकेशी बरोबरी करण्यास भारताला २१८ वर्षे लागतील

इकॉनामिक अँड सायंटिफिक रिसर्च फाँडेशन ह्या संघटनेने प्रसिद्ध केलेल्या एका अभ्यासपूर्ण अहवालाप्रमाणे १९६३ मधील अमेरिकेची आर्थिक पातळी गाठण्यासाठी भारताला २१८ वर्षांचा अवधी लागेल. दरडोई खऱ्या उत्पन्नाच्या वाढीचा सध्याचा जो वेग आहे त्यावर हा अंदाज आधारलेला आहे. अहवालाला ‘ अजून खूप वाटचाल आहे. ’ असे शीर्षक देण्यात आले असून तो तयार करताना भारत आणि इतर २७ देश ह्यांच्यामधील आर्थिक अंतरांची पहाणी करण्यात आली आहे. ह्या देशात पाकिस्तानसारख्या विकसनशील देशांप्रमाणे जपान, ब्रिटन, अमेरिका, रशिआ, ह्यासारख्या प्रगत देशांचाही समावेश आहे. १९६३ साली भारताचे दरडोई उत्पन्न अवघे ८० डॉलर्स होते. पाकिस्तानचे ८२ डॉलर्स म्हणजे खालून दुसऱ्या क्रमांकाचे होते. त्याच वर्षी जपानचे दरडोई उत्पन्न ५५९ डॉलर्स होते, तर खुद्द अमेरिकेचे सर्वात अधिक म्हणजे २,५६२ डॉलर्स होते. इ. स. २००० मध्ये भारताला १९६३ सालच्या अमेरिकेला गांठवयाचे असेल तर वाढीचा वार्षिक सरासरी वेग ९·८ टक्के असला पाहिजे. जपानला गाठण्यासाठी सुद्धा ५·४ टक्के इतका वेग असला पाहिजे. १९५०–६० साली भारताच्या वार्षिक दरडोई उत्पन्नाच्या सरासरी वाढीचा वेग अवघा १·६ टक्के होता. हा वेग सरासरी ३·२ टक्के वाढण्यासाठी भारताच्या अर्थव्यवस्थेची वाढ दरसाल ५·३ टक्क्यांनी झाली पाहिजे. आर्थिक विकासाच्या वाढीच्या ७ टक्के वेगाचे लक्ष्य गाठणे हे अशक्य नसले तरी अवघड खचित आहे.

तथापि, जपानच्या उदाहरणाचे अनुकरण करता आले तर हेही शक्य आहे. गेल्या दोन दशकात जपानने आपल्या आर्थिक विकासाचा वेग चांगला वाढवून दाखविला आहे. भारताने गेल्या २० वर्षात अनेक आर्थिक क्षेत्रांत लक्षात भरण्यासारखी प्रगती केलेली असली तरी त्याचे दरडोई मालाच्या उत्पादनाचे प्रमाण अभ्यास केलेल्या देशांत सर्वात कमी आहे. ह्याला अपवाद फक्त पाकिस्तानचा आहे. हिंदच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान असलेल्या ३२ पदार्थांचा आणि सेवांचा अहवालासाठी आधार घेण्यात आला आहे. त्यांत लोखंड व पोलाद, अल्युमिनम, तांबे, रासायनिक खते, वीज, अन्नपदार्थ, मोटारी, रेडिओ, टेलिव्हिजनचे पडदे, रेल्वे व विमानांच्या सोयी ह्यांचा समावेश आहे. लोखंड आणि पोलादाच्या उत्पादनाच्या बाबतीत भारताने गेल्या २० वर्षात बरीच प्रगति केली आहे. ह्या अवधीत पोलादाच्या ठोकळ्यांचे उत्पादन चौपटीने वाढले. भारताचे बिडाच्या लोखंडाचे व लोहमिश्रित धातूंचे वार्षिक उत्पादन ७० लाख टन आहे. ह्या दृष्टीने भारताचा क्रम जगातील पहिल्या १० देशांत लागतो. पण, दरडोई वापराचा विचार करता भारत प्रगत देशांच्या मागे तर आहेच, इतकेच काय, पण विकसनशील देशांच्या ह्या बाबतीतील क्रमांतही त्याचा नंबर २४ देशांत २३ वा लागतो.

---

## शेतीच्या अवजारांच्या उत्पादनाला अग्रक्रम द्या

चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात शेतीच्या विकासाचा आराखडा आखण्यात आला आहे. ह्या आराखड्याचा विचार करताना राष्ट्रीय उत्पादक मंडळाने अशी सूचना केली आहे की कार्यक्रमाच्या अवधीत शेतीसाठी लागणाऱ्या अवजारांच्या उत्पादनाला अग्रक्रम देण्यात यावा. शेतकऱ्यांकडून उत्पादन वाढविण्याची अपेक्षा केली जाते. पण, त्यांना शेतीची सुधारलेली अवजारे मात्र पुरेशी पुरविण्यात येत नाहीत. शेतीच्या अवजारांच्या उत्पादनात सध्या गुंतविण्यात आलेले भांडवल अत्यल्प आहे. अर्थातच अवजारांच्या उत्पादनातील वाढ खुंटून राहिली आहे. शेतीच्या मेहनत–मशागतीचा विचार करता बैलांच्या किंमती वाढत चालल्या आहेत. त्यांना पोसणेही कठीण होऊ लागले आहे. आता अशी परिस्थिती उत्पन्न झाली आहे की छोटया शेतकऱ्याला बैल वापरण्यापेक्षा यांत्रिक नांगर वापरणे अधिक काटकसरीचे झालेले आहे. भातशेतीच्या नांगरणीच्या बाबतीत तर हे अधिकच खरे आहे. भारत सरकारने जपानकडून १,६०० यांत्रिक नांगर आयात केले होते. त्यांच्या वापरासंबंधी कसोटया घेण्यात आल्या असता असे आढळून आले की भारतामधील भातशेतीची नांगरट ते चांगल्या रीतीने करू शकतात. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीपर्यंत अशा यांत्रिक नांगरांची सालिना मागणी १ लाखाच्या घरात जाईल असा अंदाज आहे. इतकी मोठी मागणी येण्याची शक्यता असताना सुद्धा सरकारने फक्त ५० हजार नांगर करण्याचे परवाने दिलेले आहेत. शेतीच्या अवजारावरील अबकारी कर रद्द करण्याची आवश्यकता मंडळाने प्रतिपादली आहे.

---

## " व्याज देता येत नाही, पण आणखी कर्ज द्या. "

### भारत सरकारचे सावकारांना आवाहन

परदेशी कर्जाच्या परतफेडीचे हप्ते आणि व्याज ह्यांसाठी १९७०–७१ मध्ये ३६६ कोटी रु. लागतील, त्यामुळे नव्या अंदाजपत्रकात परदेशी मदतीची अपेक्षित जमा फक्त २३४ कोटी रु. धरण्यात आली आहे.

चालू वर्षी, १९६९–७० मध्ये, परदेशी कर्जाची आवक ६७५ कोटी रु. धरण्यात आली होती; परंतु दुरुस्त अंदाज ५८० कोटी रुपयांचा आहे. त्यापैकी १८० कोटी रुपये जुन्या कर्जाच्या परतफेडीसाठी खर्च होऊन १५७ कोटी रुपये व्याजापायी जाणार. अंदाजपत्रकाप्रमाणे, २०७ कोटी रुपयांची फर्जफेडीची तरतूद होती. परंतु जागतिक बँक, अमेरिका, जपान आणि प. जर्मनी ह्यांनी परतफेडीच्या हप्त्यांत वेळेची सवलत दिली त्यामुळे २८ कोटी रुपये चालू वर्षी द्यावे लागणार नाहीत. १९७०–७१ मध्येही अशीच सवलत मिळेल अशी आशा बाळगून, करारापेक्षा ३३ कोटी रु. कमीची परतफेडीसाठी तरतूद केलेली आहे..

येत्या काही वर्षांत कर्जफेडीचे हप्ते आणि व्याज ह्यांसाठी अधिकाधिक रक्कम लागणार आहे. कर्ज आणि मदत ह्यांची रक्कम कमी कमी होत आहे. म्हणजे, अंदाजपत्रकावरील ताण वाढत जाणार आहे. मंदी कमी झाल्यामुळे भारतात गुंतवणुकीची गरज मात्र वाढणार आहे. म्हणून, भारत सरकार आपल्या सावकार देशांना जुन्या कर्जफेडीत सवलत, व्याजात सवलत आणि त्याचबरोबर आणखी भरीव मदत मागणार आहे.

---

### देवळांचे पुजारी निर्माण करण्यासाठी शाळा

त्रावणकोर देवस्थान बोर्डाच्या कक्षेतील देवळांतून हरिजनही पुजारी बनण्याचे दिवस जवळ आले आहेत. बोर्डाने कोट्टायम जवळील रामकृष्ण आश्रमात 'तंत्र वेदान्त शाळा' सुरू केली असून तेथे विद्यार्थ्यांना 'तंत्री' म्हणजे पुजारी होण्याचे शिक्षण दिले जाते. सध्या त्या शाळेत १० विद्यार्थी असून त्यापैकी दोघे हरिजन आहेत. एका पदवीधरानेहि शाळेत नाव घातलेले आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना नैवेद्य तयार करण्यासही शिकविले जाते. शाळेत देवाची एक मूर्तीही प्रात्यक्षिकासाठी बसविण्यात आलेली आहे. दोन वर्षांचा अभ्यासक्रम यशस्वी रीतीने पार पाडणारास प्रमाणपत्रे दिली जातील व बोर्डाच्या कक्षेतील देवळांतून त्यांना नेमण्यात येईल.

---

### संस्थानिकांचे पाठोपाठ आय. सी. एस. अधिकारी

"नवीन वातावरणा"च्या दृष्टीने, आय. सी. एस. अधिकाऱ्यांना सध्या असलेले खास हक्क व सवलती नष्ट केल्या जाणार आहेत. त्यांचा समावेश राज्यघटनेच्या ३१४ व्या कलमात आहे. सध्या ८३ आय. सी. एस. अधिकारी मध्यवर्ती सरकारच्या नोकरीत असून २८ जण राज्य सरकारांच्या नोकरीत आहेत.

---

**लॉटऱ्यापासून ४·३७ कोटी रु. मिळाले** —महाराष्ट्र राज्य सरकारला लॉटऱ्यापासून १५ जानेवारी, १९७० अखेर ४·३७ कोटी रु. निवळ उत्पन्न मिळाले. लॉटरी एजंटांना १ कोटी रु. कमिशन दिले गेले. बक्षिसांची मागणी न केल्यामुळे, नियमानुसार १५·७३ लक्ष रु. ची रक्कम सरकारकडे जमा झाली.

**परदेशी प्रवाशांनी दिलेले परदेशी चलन**—१९६९ मध्ये भारतात येऊन गेलेल्या २,४४,७२४ परदेशी प्रवाशांपासून ३१·११ रु. ची परदेशी चलनाची सरकारला प्राप्ती झाली.

**प्रजासत्ताक दिन साजरा करण्यासाठी खर्च** - मध्यवर्ती सरकारने दिल्लीमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा करण्यासाठी १९६५ ते १९६९ पर्यंत पुढीलप्रमाणे खर्च केला. ७·३ लक्ष रु., ८·८ लक्ष रु., ९·२ लक्ष रु., ११·८ लक्ष रु. आणि १६·६ लक्ष रु.

**स्कूटर्ससाठी ६ कोटी रु. अनामत** —स्कूटरकरिता नाव नोंदविण्यासाठी पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेत २५० रु. अनामत ठेवावे लागतात. त्यावर ३% दराने व्याज मिळते. अशा रीतीने ६ कोटी रु. सरकारकडे जमा आहेत. म्हणजे, २·४ लक्ष लोकांनी स्कूटरसाठी नावे नोंदवलेली आहेत.

**" अपनी बेगम की खिदमत "**—श्री. अब्दुल घानि दार हे श्री. गिरी ह्यांची राष्ट्रपतीचे जागी झालेली निवडणूक रद्द करण्यासाठी सुप्रीम कोर्टात अर्ज करणारांपैकी एक आहेत. साक्षीदार म्हणून त्यांनी शपथ घेतल्यावर त्यांना त्यांचा धंदा विचारला, तेव्हा त्यांनी "मी माझ्या बायकोची नोकरी करतो" असे उत्तर दिले.

**फिल्म फिनॅन्स कॉर्पोरेशन** —फिल्म फिनॅन्स कॉर्पोरेशनची स्थापना १९६० साली झाली. १९६८–६९ मध्ये तिला १३,००० रु. नफा झाला. तिने ७४ लक्ष रुपयांची कर्जे दिलेली असून ९ लक्ष रुपयांचे व्याज येणे आहे.

**दीड कोटी लोक दुष्काळग्रस्त** —१९६९–७० मध्ये गुजरात, मध्यप्रदेश, म्हैसूर आणि राजस्तान ह्या राज्यातील दीड कोटी लोकांना दुष्काळाचा तडाखा बसला. मध्यवर्ती सरकारने ४१ कोटी रु. ची मदत केली.

**संत कोश** —रोमन कॅथॉलिक धर्माच्या संतांची माहिती देणारा १२ खंडांचा एक कोश तयार करण्यात आला आहे. त्यासाठी ५०० तज्ज्ञ १० वर्षे खपत होते.

**पंतप्रधानांचे नेत्रदान** — पंतप्रधान, श्री. इंदिरा गांधी ह्यांनी नेत्रपेढीला आपल्या डोळ्यांचे दान केले आहे. त्याचा अर्थ, त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची बुबुळे काढून घेऊन ती एकाद्या आंधळ्याच्या डोळ्यात बसविण्यात यावी, असे त्यांनी लिहून दिले आहे.

---

# सहकारी कर्जपुरवठ्याला मध्यवर्ती बँकांची जरूरीच काय?

## सहकारमंत्री ना. यशवंतराव मोहिते ह्यांचे परखड विश्लेषण:

## कार्यकर्त्यांना स्पष्ट इशारा

जमीन तारण ठेवून कर्ज देण्याची पद्धत आज कालबाह्य होत आहे. जमीनतारणाऐवजी पिकावर कर्ज दिले गेले पाहिजे सध्या रिझर्व्ह बँकेतून ३ टक्के दराने अपेक्स बँक कर्ज घेते. ३½ टक्के दराने जिल्हा बँकांना अपेक्स बँक कर्ज देते; ५ टक्के दराने जिल्हा बँका सोसायटीला कर्ज देतात आणि शेतकऱ्यांना ८ ते ९ टक्के दराने सोसायटीतून कर्जपुरवठा होतो. व्याजाचा दर कमी करण्याच्या दृष्टीने सहकारी चळवळ'त कोठे तरी बदल करण्याची गरज निर्माण झाली आहे सरकारी धोरण म्हणून आपण हे विचार मांडत नाही असा खुलासा करून श्री. मोहिते यांनी पुढील कल्पना मांडली :—

सध्या कर्जपुरवठा करण्याची त्रिस्थळी (Three tier) योजना आहे. (१) अपेक्स बँक (२) जिल्हा मध्यवर्ती बँक (३) तालुका सोसायटी. रिझर्व्ह बँकांतून घेतलेल्या कर्जावर अपेक्स बँका फक्त ४ आणे व्याजाचा दर आकारतात. या बँकेची नव्या परिस्थितीतही गरज कायम राहते. परंतु जिल्हा मध्यवर्ती बँकांचे अस्तित्व कशासाठी? ३ ते ३। टक्के व्याजाचा दर आकारून तालुका सोसायटीला कर्जपुरवठा करण्यापलिकडे या बँकांतून दुसरे कोणते काम होते? आजच्या बदललेल्या परिस्थितीत या बँका बंद केल्या तर चालणार नाही का? तालुका सोसायट्यांचा गावकऱ्यांशी प्रत्यक्ष सबंध येतो म्हणून त्या कायम राहाव्यात. लहान सोसायट्या मोडून त्यांना एक ते पाच लाख रुपये भांडवलाचा व्यवहार करण्याची क्षमता निर्माण करून द्यावी. प्रत्येक गांवकऱ्यास पाच मैलांच्या आत अशी सोसायटी उपलब्ध झाली पाहिजे पूर्ण वेळ काम करणारे कर्मचारी अशा सोसायट्यांना द्यावेत. अशा सोसायट्यांचा सरळ व्यवहार अपेक्स बँकेशी जोडला जावा.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे अस्तित्व संपवून सोसायट्यांचा कारभार वाढविण्याची कल्पना सहकारी कार्यकर्त्यांना मान्य असल्याचे दिसले. सामान्य कार्यकर्त्यांचा जरी या योजनेस पाठिंबा असला तरी जे बडे पुढारी आज या बँकांवर आहेत, त्यांची मूळ गादी संपुष्टात आणण्याचाच हा विचार असल्याने त्यांचा विरोध या नव्या कल्पनेला प्रखरतेने होण्याची अधिक शक्यता आहे.

सहकारी चळवळीची सध्या जी वाटचाल चालू आहे त्याचे मोठे भेदक चित्र आहे.

(१) जिल्हा सहकारी बँका व्याजाचा दर वाढवून कर्जपुरवठा करतात यापलिकडे त्यांच्या कामाची मजल गेली नाही.

(२) साखर धंदे सोडले तर इतर व्यवसाय तोट्यात चाललेले आहेत.

(३) सूतगिरण्या, तेलगिरण्या व इतर प्रक्रियात्मक कारखाने असे मिळून २७८ उद्योगधंदे महाराष्ट्रात सहकारी चळवळीत सुरू केले होते. त्यापैकी फक्त २९ सोसायट्या नफ्यात आहेत. ६४ संस्थांचे शेअर भांडवल तोट्याने खाऊन टाकले आहे. बाकीच्या संस्थांना जर मदत केली नाही तर एक-दोन वर्षांत बंद कराव्या लागतील, अशी त्यांची अवस्था आहे. प्रक्रियात्मक कारखानदारीत भले मोठे पाऊल टाकले, त्याची फलनिष्पत्ती काय, तर फार मोठे अपयश आलेले आहे.

सहकारी शेती संस्थांच्या बाबतीतही असेच अपयश आहे. सहकारी शेती संस्था नवीन जमीन लागवडीखाली आणू शकल्या नाहीत.

आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या समाजासाठी चालविण्यात येणाऱ्या उद्योगधंद्यांची परवड झाली आहे. हीच अवस्था सहकारी ग्राहक संस्थांतून आढळते. महाराष्ट्रांतील पाच-सहा ग्राहक संस्था सोडल्या तर बाकीच्या सर्व 'लिक्विडेशन'मध्ये निकालात निघाल्या आहेत.

पिकांवर कर्ज देण्याच्या मोहिमेतही सहकारी बँकांना भरगच्च अपयश आले आहे. "एकेक जिल्हा बँक २० कोटींचा व्यवहार करते. मोजक्या हितसंबंधी मंडळींच्या हातात कारभार असतो. शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी भांडवल संचय वापरला गेला नाही. दिलेल्या कर्जाची वसुली ५० टक्क्यांच्या आत यावयास लागली आहे. ८० टक्के थकबाकीमध्ये शेतकऱ्याचे भांडवल गुंतले आहे. तरीही सोसायट्या फायद्यात आहेत. बँका फायद्यात आहेत. शेतकऱ्यांचे शेअर भांडवल 'बॅलन्स शीट' मध्ये घातले म्हणजे झाले. सर्वच गुंतागुंत आहे. बँकांच्या पुढाऱ्यांबाबत तर काय बोलावे? याचा डोळा त्याच्यावर, त्याचा डोळा याच्यावर आणि सर्वांचा सर्वांवर, अशी अवस्था आहे.

अनेक सहकारी बँकांमधून शेअर भांडवल ६ ते ७ कोटीपर्यंत जमा झाले आहे. अशा बँकांतून शेतकऱ्यांना शून्य दराने कर्जपुरवठा व्हावयास हवा. परंतु शेअर भांडवलाचा विनियोग कमी व्याजासाठी होत आहे नाही तर भलत्याच ठिकाणी हा विनियोग झाला. स्थावर मालमत्ता ही बँकांची आता पत राहिली नाही. सरकारची हमी ही बँकांची खरी पत आहे.

आर्थिक दृष्ट्या कमकुवत समाजासाठी हेतुपुरस्सर आर्थिक मदत करण्यासाठी सरकार बांधलेले आहे. पत असो वा नसो, आर्थिक दृष्ट्या कमकुवत समाजाला आम्हास मदत करावयाची आहे. सहकारी चळवळीच्या नेतेपदी ह्या वर्गातील मंडळी नसल्यामुळे त्यांच्या गरजांकडे दुर्लक्ष झाले. अशा समाजासाठी

चालविण्यात येणाऱ्या संस्थांवर 'मॅनेजरिअल सबसिडी' सरकारने दिली. परंतु ती सर्व वाया गेली. चेअरमन व सेक्रेटरी यांनीच ती खाऊन टाकली. आर्थिक दृष्ट्या कमकुवत समाजाला मदत करण्यासाठी सरकारनें आपल्या महसुली उत्पन्नांतून पैसा द्यावा यासाठी आपण आग्रह धरणार आहो. सहकारी कायदा करताना तुम्ही सज्जन आहात हे समजून कायदा केला. न्याय, नीति व कायद्याचे मार्ग सोडून देऊन जर तुम्ही वागू लागलात तर ते चळवळीला मारक ठरेल. अशी प्रतारणा सर्रासपणे होऊ लागली आहे. मूळ पायालाच ही मंडळी हात घालू लागली आहेत. ज्या थोर लोकांनी या चळवळीची ओपासना केली आणि चळवळीचा आत्मा वाढविला त्या वृत्तीची जोपासना करणार नसाल तर समाज व चळवळीसाठी संरक्षणात्मक कायदा करावा लागेल. जे न्यायाचे व आपल्या वाटणीचे नाही ते सोडावे आणि आपले हात स्वच्छ ठेवावेत. ज्याचे हात स्वच्छ राहणार नाहीत त्यांच्या हातांत बेड्या पडतील अशी तरतूद करावी लागेल.

---

## त्वचेच्या रोगांवर उपासाचा उपाय

मॉस्कोमधील एक वैद्यकीय संघटना त्वचेच्या अनेक प्रकारच्या रोगांवर उपासाचा उपाय यशस्वीपणे करीत आहे. चर्म रोगाने पछाडलेल्या ज्या रोग्यांवर उपवासाचा उपचार करण्यात आला त्यांना रोगाचा पुन्हा त्रास झाला नाही. ह्या उपचार पद्धतीत रोग्यांना ७ पासून ३० दिवसांपर्यंत अन्न दिले जात नाही. अर्थात्, उपचार रोग्याच्या प्रकृतीचे तानमान पाहूनच करण्यात येतो. उपवासाच्या अवधीत त्याला नैसर्गिक खनिज मिश्रित पाणी पिण्याची मुभा असते. त्याशिवाय जितका वेळ उघड्यावर मोकळ्या हवेत काढता येईल तितका काढण्याचा सल्ला त्याला देण्यात येतो. भारतात परंपरेने चालत आलेल्या देशी उपचार पद्धतीत उपवासाला महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. लंघन चिकित्सा असे नावच तिला आहे.

---

## चित्रपटनिर्मितीत जपान पहिला, भारत दुसरा

'पॅरिस-मॅच' मासिकाने प्रसिद्ध केलेल्या आकड्यांप्रमाणे, जगातील सर्व देशात चित्रपटनिर्मितीच्या बाबतीत जपान अग्रेसर आहे. दुसऱ्या अनुक्रमाच्या भारताच्या दुपटीपेक्षा अधिक चित्रपट जपान तयार करतो. १९६९ मधील पहिल्या १० अनुक्रमांचे देश व त्यात तयार झालेले चित्रपट, ह्यांचा तपशील खाली दिला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ जपान | ७१९ | ६ अमेरिका | १६८ |
| २ भारत | ३१६ | ७ स्पेन | १६० |
| ३ तैवान | २५७ | ८ रशिया | १५९ |
| ४ इटली | २४५ | ९ कोरिया | १४२ |
| ५ हाँगकाँग | १७१ | १० फ्रान्स | ९७ |

---

## डी. डी. टी. च्या वापरावर बंदीचा संभव नाही

हिंदमधील तुटपुंज्या अन्नधान्याच्या उत्पादनावर अनेक प्रकारच्या किडींचा वाईट परिणाम होतो. कीड व रोगराई ह्यापासून पिकांचे रक्षण करण्यासाठी डी. डी. टी. ह्या औषधाचा उपयोग प्रथम २५ वर्षांपूर्वी प्रगत देशांत सुरू झाला. भारतात सध्या ह्या औषधाचा बराच उपयोग करण्यात येत आहे. परंतु औषधाचे उगमस्थान असणारे बरेच प्रगत देश मात्र त्याच्या वापरावर बंदी घालण्याचा विचार करीत आहेत. काहींनी तर अशी बंदी घातली आहे अगर निर्बंध जारी केले आहेत. ह्या औषधाच्या वापरामुळे पिकांचे रक्षण होत असले तरी मनुष्य प्राण्याच्या आणि जनावरांच्या जिवाला त्यापासून अपाय होतो असा अनुभव पाश्चात्य देशात आला आहे. भारतात हे औषध हिंदुस्थान इन्सेक्टिसाइडस् ही कंपनी तयार करते. पाश्चात्य देशात औषधाच्या वापराविरुद्ध मत होऊ लागल्यावर भारत सरकारने कंपनीकडे त्याच्या वापराविषयी एका अहवालाची मागणी केली होती. सदर अहवाल हाती आला असून त्यात असा अभिप्राय व्यक्त करण्यात आला आहे की हे जंतुनाशक औषध जर अतिरिक्त प्रमाणात आणि वाटेल तसे व तितके वापरण्यात आले तरच ते अपायकारक ठरते. भारतामधील ह्या औषधाची मागणी फार मोठी आहे. ती पुरी करता येत नाही. तेव्हा त्याच्या गैरवापराचा फारसा प्रश्नच उद्भवत नाही. युरोप अगर अमेरिकेसारख्या देशांत ह्या औषधाऐवजी दुसरी कमी अपायकारक औषधे वापरण्याचे प्रयत्न होत आहेत. पण नवी औषधे तयार करून वापरण्याचे भारताला परवडण्यासारखे नाही.

---

## प्रेसिडेंट निक्सन ह्यांची काटकसर मोहीम

अमेरिकेत मंदीची भीति निर्माण झाली असून इकडे किंमती आणि पगार वाढत आहेत. येत्या अंदाजपत्रकात सरकारी खर्चामध्ये बरीच काटकसर सुचविली जाईल. त्यामुळे १२,५०,००० लोकांना रोजगारास मुकावे लागेल, असे संरक्षण खात्याच्या चिटणिसांनी सांगितले.

---

## चित्रपटांची स्पेनला निर्यात?

भारतात तयार झालेल्या चित्रपटांची स्पेनला निर्यात करण्याचे प्रयत्न चालू आहेत. इंडिअन मोशन पिक्चर्स एक्सपोर्ट कॉर्पोरेशनच्या आमंत्रणावरून स्पेनमधील एक प्रमुख वितरक हिंदी चित्रपट पहाण्यासाठी आले होते. त्यांना ३० हिंदी बोलपट व अनुबोधपट दाखविण्यात आले. हिंदी चित्रपट मुख्यतः स्थानिक आवडीनिवडीनुसार तयार करण्यात येतात अशी तक्रार त्यांनी केली. शिवाय हिंदी नटनटी स्पेनमध्ये लोकप्रिय नाहीत असेही त्यांनी सांगितले. स्पेनमध्ये परत गेल्यावर हिंदी चित्रपटाबद्दल अनुकूल ग्रह निर्माण करण्यासाठी ते लेख लिहिणार आहेत.

---

## पश्चिम बंगालमधील राजकीय अस्थिरतेचे आर्थिक परिणाम

पश्चिम बंगालमधील संयुक्त आघाडीचे सरकार अधिकारावर आल्यापासून तेथील राजकीय परिस्थिती घसरत चाललेली आहे. गेल्या कांही महिन्यांत ह्या परिस्थितीचे पडसाद आर्थिक क्षेत्रातही उमटू लागले आहेत. राज्यांतील उद्योगधंदे बाहेर पडण्याच्या प्रयत्नांत आहेत. पण, इतकेच नाही. उद्योगधंद्यांतील मध्यम स्तरातील नोकरवर्गही छाकदपटशाच्या भीतीने इतर राज्यात स्थलांतर करू लागला आहे. राज्याबाहेर पडणाऱ्या ह्या लोकांत खुद्द बंगाली लोकांची संख्या ४० टक्के आहे. राज्य सरकारला ह्याची जाणीव आहे. परंतु ते काही करू शकत नाही. राज्य एक प्रकारच्या कात्रीत सापडलेले आहे. भांडवल गुंतविणाऱ्यांना राज्यात येण्यास उत्तेजन देण्यात येत आहे. परंतु त्याचवेळी उद्योगपतींनी राज्यांत राहण्यासाठी म्हणून त्यांचे मन सरकारला वळविता येत नाही. १९६९ साली झालेल्या घेराओंमुळे आणि कामगारांतील असंतोषामुळे उद्योगपती अतिशय त्रस्त झालेले आहेत. त्यांच्या कारखान्यांतील मध्यम स्तरांतील दहादहा, पंधरापंधरा वर्षांच्या अनुभवाचे अनेक लोक राज्याबाहेर पडत आहेत. इतक्या अनुभवाचे लोक नव्याने मिळविणे जवळजवळ अशक्य आहे. राज्याचे मुख्यमंत्री श्री. अजय मुकर्जी ह्यांनी ह्या परिस्थितीबद्दल मजूर पुढाऱ्यांना दोष दिला आहे. त्यांच्या मताने पुढाऱ्यांचे धोरण नुसतेच घातक नसून राज्याच्या हितसंबंधाशी वैर पुकारणारे आहे. मोठमोठ्या कारखान्यांच्या अनेक कचेऱ्या राज्याबाहेर जात आहेत व कित्येक उद्योगपती आपले कारखानेही बाहेर हलवीत आहेत. ह्या वृत्ताला त्यांनी दुजोरा दिला आहे.

---

## अमेरिकेला जाणारा बुद्धिमंतांचा ओघ मंदावला

अमेरिका हा देश सुखसंपन्न असल्यामुळे आणि तेथे आधुनिक तंत्रज्ञानाला भरपूर वाव असल्यामुळे अनेक देशांतील निरनिराळ्या क्षेत्रांतील बुद्धिमान लोक तिकडे आकृष्ट होत असतात. शास्त्रज्ञ एंजिनिअर्स, डॉक्टर्स, इत्यादी कुशल काम करणारे अनेक परदेशी लोक तेथे कायमचे वास्तव्यही करीत आहेत. अलीकडे मात्र अशा लोकांचा तिकडे जाणारा ओघ मंदावला आहे. अमेरिकेच्या नॅशनल सायन्स फौंडेशनने दिलेल्या माहितीप्रमाणे १९६९ साली १०, ३०० परदेशीय शास्त्रज्ञ आणि एंजिनिअर्स अमेरिकेंत आले. १९६८च्या मानाने ही संख्या २१ टक्क्यांनी कमी आहे. १९६९ साली २,८०० डॉक्टर्स अमेरिकेत आले. त्यांची संख्याही १९६८ च्या मानाने १० टक्क्यांनी कमी आहे. १९६५ सालापासून कुशल तंत्रज्ञांच्या संख्येत झपाट्याने वाढ होऊ लागली. तेव्हापासून अमेरिकेंत आलेल्या तंत्रज्ञांची ही सर्वात कमी संख्या आहे. भारतामधून सर्वात अधिक शास्त्रज्ञ व एंजिनिअर्स अमेरिकेत आले, त्याखालोखाल फिलिपाइन्समधून आणि ब्रिटनमधून तंत्रज्ञ अमेरिकेंत आले. गेल्या वर्षापर्यंत ब्रिटनहून आलेल्यांची संख्या सर्वांत आधिक असे. परदेशीय लोकांच्या प्रवेशाविषयी सरकारने दिलेल्या माहितीप्रमाणे भारतामधून १,७०० शास्त्रज्ञ व एंजिनिअर्स आले. फिलिपाइन्समधून १,५०० आले आणि ब्रिटनमधून १,००० आले. फिलिपाइन्समधून आलेल्या डॉक्टरांची संख्या सर्वांत आधिक आहे. शास्त्रज्ञांपैकीसुमारे निम्मे शास्त्रज्ञ आणि डॉक्टर्सपैकी एक चतुर्थांश ३० वर्षे वयाच्या खालील आहेत. त्यांपैकी ४३ टक्के न्यूयॉर्क, इलिनॉइस अगर कॅलिफोर्नियांत वास्तव्य करून आहेत.

---

## गोव्यात जुगार खेळण्याचे केंद्र होणार ?

गोव्यात जुगार खेळण्याची व्यवस्था करणारे आणि त्यासोबतच रात्रक्लबाची सोय करणारे एक केंद्र स्थापन होण्याची शक्यता आहे. गोव्याच्या सरकारकडे एका खाजगी व्यक्तीकडून अशा प्रकारचा क्लब काढण्याची एक योजना सादर करण्यात आली आहे. योजनेसाठी ५० लाख रुपये खर्च येईल. तेथील मुख्य आकर्षण म्हणजे जुगार खेळण्याची अधिकृत व कायदेशीर सोय राहील. अशाच प्रकारची आणखीही एक योजना गोव्याच्या सरकारला सादर करण्यात आली आहे. ती तर पहिलीपेक्षाही मोठी आहे. ह्या योजनेला १.५ कोटी रुपये खर्च येईल. अद्याप ह्या योजनेचा पूर्ण तपशील तयार झालेला नाही. पहिल्या योजनेत पोहण्याचा तलाव, टेनिस कोर्टे, छोटेसे गोल्फचे मैदान, ह्यांचा समावेश आहे.

---

## तीन नवीन पोलादाचे कारखाने

दक्षिण भारतात तीन नवीन पोलादाचे कारखाने स्थापन करण्याचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे. नवे कारखाने बहुधा तामीळ नाडूमधील सेलम येथे, म्हैसूरमधील होसपेट विभागात आणि आंध्र राज्यातील विशाखापट्टम येथे उभारले जाण्याचा संभव आहे. बोकॅरो आणि भिलई येथील कारखान्यांच्या विस्ताराच्या योजनाशिवाय सर्वस्वी नवीन असे हे कारखाने होतील. बोकॅरो आणि भिलाई येथील कारखान्यांचा नियोजित विस्तार पूर्ण झाला म्हणजे नव्या कारखान्यांची उभारणी हाती घेण्यात येईल. प्रथम फक्त एकच नवा कारखाना दक्षिण भारतात उभारण्याचा विचार होत होता. कारखान्यासाठी तांत्रिक दृष्ट्या योग्य अशा ठिकाणांचीच निवड करण्यात येईल. नवीन कारखाने बंदरांजवळ उभारले तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पोलाद निर्यात करणे सोपे जाईल अशी सरकारची धारणा आहे.

---

**बँक खातेदाराला २४ तास पैसे मिळण्याची नवी योजना**—राष्ट्रीयीकरण केलेल्या बँकापैकी सेंट्रल बँक ऑफ इंडिआने आपल्या खातेदारांची चोवीस तास, सुटीच्या दिवशी-सुद्धा, सेवा करण्याची योजना मुंबईत अमलात आणली आहे. ठेवीदाराला त्यामुळे आपल्या 'इमर्जेन्सी व्हाउचर' ची रक्कम बर्मा शेलच्या निवडक पेट्रोल पंपांवर बँकेच्या कामाच्या तासा-खेरीज इतर वेळी मिळू शकेल. ही व्हाउचर्स ५० रु. आणि १०० रु. ची असून एका वेळी एकाला १०० रु. पेक्षा जास्त रकमेची व्हाउचर्स कॅश करता येणार नाहीत.

**सात 'बोइंग ७३७ जेट' विमानांची खरेदी**—इंडियन एअर लाइन्सचे चेअरमन, श्री मोहन कुमारमंगलम् ह्यांनी जाहीर केले आहे, की एअरलाइन्सने २४ कोटी रु. ची सात 'बोइंग ७३७ जेट' विमाने अमेरिकेत खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्यांची किंमत देण्यासाठी यु स्टे. एक्स्पोर्ट-इंपोर्ट बँकेकडून आणि व्यापारी बँकांकडून कर्जे घेण्यात येतील. मुंबई-कलकत्ता-नवी दिल्ली ह्या मार्गावर त्यांची मे, १९७१ मध्ये वाहतूक सुरू होईल.


**ब्रिटिश डनलॉप आणि इटालिअन पिरेली कंपन्यांचे एकत्रीकरण**—डनलॉप ही प्रचंड ब्रिटिश रबर कंपनी पिरेली ह्या प्रचंड इटालिअन रबर कंपनीशी एकत्रीकरण करणार आहे. प्रत्येक कंपनी दुसरीचे ४९% भाग भांडवल खरेदी करील. अमेरिकन टायर कारखानदारांच्या जागतिक बाजारपेठेतील स्पर्धेस तोंड देणे, हा त्याचा उद्देश आहे. डनलॉप-पिरेली हिचा गुडइअर ह्या अमेरिकन प्रचंड रबर कंपनीच्या खालोखाल अनुक्रम लागेल.

**नव्या पेनिसिलिनचा शोध**—फिनलंडमधील चार शास्त्रज्ञांनी एका नव्या प्रकारच्या पेनिसिलिनचा शोध लावल्याचा दावा केला आहे. प्राण्यांवर व माणसांवर त्याचा उपयोग करून पाहण्यात आला असता नेहमीच्या पेनिसिलिनपेक्षा त्याचा गुण तिपटीने अगर चौपटीने अधिक काळ टिकतो असे आढळून आले. मूत्रपिंडाला आलेल्या सुजेवरसुद्धा ते परिणामकारी ठरले आहे.

**बुद्धाच्या जन्मस्थानाचा विकास**—गौतम बुद्धाचा जन्म हिमालयाच्या कुशीतील लुंबिनी ह्या निसर्गरम्य ठिकाणी झाला. ह्या ठिकाणाचा, जागतिक यात्रेचे एक महत्त्वाचे स्थान म्हणून विकास करण्यात येणार आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सांस्कृतिक शाखेने ह्या कामासाठी एक योजना तयार केली आहे. योजने-साठी ४·२५ कोटी रुपये खर्च येईल.

**अमेरिकन रेडिओवर सिगारेट्सच्या जाहिरातींना बंदी**

अमेरिकन सीनेटने रेडिओ आणि टेलिव्हिजनवरील सिगारेट्सच्या जाहिरातींना बंदी घालणारे बिल ७५ विरुद्ध ९ मतांनी मंजूर केले आहे. हाउस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हजनी आणि प्रेसिडेंटनी मंजुरी दिल्यास १ जानेवारी, १९७१ पासून बंदी अमलात येईल.


**GADRE BROTHERS**
**ENGINEERS & FOUNDERS**
**MADHAVNAGAR [S. Rly.]**
Phone : 318 Sangli — Gram : 'SEWA Madhavnagar

## महाराष्ट्रातील नामवंत बँक
शेड्यूल्ड बँक] [स्थापना - १९३६
# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
सातारा
रजिस्टर्ड ऑफिस : १८३-१४६, भवानी पेठ, सातारा शहर.

आपल्या ४३ शाखांनिशी आपल्या सर्व प्रकारच्या बँकिंगच्या सेवा आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात तत्पर.

खेळते भांडवल : १२ कोटींचे वर
ठेवी : ११·७५ कोटींचे वर


ठेवींचे आकर्षक व्याजाचे दर.
तऱ्हेतऱ्हेच्या उद्योगधंद्यांस साहाय्य.
कोणत्याही शाखेस भेटा अगर लिहा.


वि. श्री. दामले
बी. ए., एम्. कॉम्., एल्एल्. बी., सी. ए. आय्आय्. बी. चेअरमन




® वरील ट्रेडमार्क किर्लोस्कर प्रोप्रायटरी लिमिटेड या कंपनीच्या मालकीचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क असून किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड ही कंपनी त्याचा वापर करणारी अधिकृत कंपनी म्हणून नोंदविलेली आहे.

---



इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.

कारखानदार—

## न्यू विजय इंडस्ट्रीज लि.

विश्रामबाग—सांगली (महाराष्ट्र)

फोन : २३२ तार : Vijayplow

# तुम्हांला इंग्रजी येत नसेल तरी चिंता नाही. महाराष्ट्र बँकेत प्रादेशिक भाषेतूनही व्यवहार केला जातो



तुमचा लाखो रुपयांचा व्यवहार इंग्रजीवाचून अडणार नाही
महाराष्ट्र बँक म्हणजे तुमची भाषा समजणारी बँक तुमच्या जिव्हाळ्याची बँक।

**बँक ऑफ महाराष्ट्र**

हेड ऑफीसः ११७७, बुधवार पेठ, पुणे-२.

8961


हे पत्र पुणे पेठ, शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)